सीएनआर क्र. एमएचएसआय–०५०००१७५२०२४

## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.७/२०२४ मधील निशाणी ०५ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा अर्जदार यांनी सामनेवाला क्र. १ विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १२५ अन्वये अंतरिम पोटगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार यांचे अर्जात असे कथन आहे की सामनेवाला क्र. १ व २ यांनी अर्जदार यांच्या मूळ तक्रार अर्जात नमूद केलेप्रमाणे हरप्रकारे शारीरिक व मानसिक छळ केलेला आहे. एवढेच नव्हे तर अर्जदार याच्या पोटापाण्याची, राहण्याची व कपडालत्त्याची देखील कोणतीही सोय केलेली नाही. तसेच अर्जदार याला लागणाऱ्या जीवनावश्यक बाबींची देखील कोणतीही व्यवस्था केलेली नाही. सामनेवाले क्र. १ हा वेंगुर्ला तालुक्यातील प्रसिद्ध असा चांगले काम करणार इलेक्ट्रिशियन असून त्याला सुमारे दरमहा सुमारे रू. ४०,०००/– (रूपये चाळीस हजार मात्र) एवढा पगार आहे. सामनेवाला क्र. १ याचेवर अर्जदार व सामनेवाला क्र.२ व नातू प्रतिक यांचेव्यतिरिक्त अन्य कुणाचीही पालनपोषणाची कसलीही कायदेशीर जबाबदारी नाही. या सर्व परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार होऊन अर्जदार याला सदरहू अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यंत सामनेवाला क्र. १ याचेकडून दरमहा रक्कम रू. १५,०००/– (रूपये पंधरा हजार मात्र) याप्रमाणे आर्थिक मदत म्हणजेच एकतर्फी अंतरिम पोटगी मिळावी व सामनेवाला क्र. १ यास तसे जरूर ते आदेश व्हावेत अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

०३. सामनेवाला क्र. १ व २ हे हजर होऊन देखील त्यांनी आपले म्हणणे दाखल केलेले नाही. सबब, सामनेवाला क्र. १ व २ यांच्याविरूद्ध त्यांचे प्रस्तुत अर्जावर म्हणणे नाही असा आदेश पारीत करून सदर अर्ज त्यांच्या म्हणण्याविना चालविण्यात आला.

०४. अर्जदार यांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. उभयपक्षकार यांच्या कथनावरून खालील वादप्रश्न मी माझ्या विचारार्थ घेतले आहेत व त्यावरील माझे निष्कर्ष खालील प्रमाणे मांडत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १ | सामनेवाला क्र. १ व २ यांनी अर्जदार याचा मूळ तक्रार अर्जात नमूद केल्याप्रकारे शारिरीक व मानसीक छळ केलेला आहे काय व सामनेवाला क्र. १ व २ हे अर्जदार यांचा सांभाळ करण्यास दुर्लक्षीत करतात हे अर्जदार यांनी प्रथमदर्शनी सिद्ध केला काय ? | होय. |
| २ | अर्जदार अंतरिम अर्थसहाय्य मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | होय. दरमहा अर्जदार यांना रक्कम रुपये ३,०००/– (रक्कम रुपये तीन हजार) |
| ३ | आदेश काय ? | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

०५. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ अन्वये महिला व जेष्ठ नागरिक यांना होत असलेल्या शारिरीक, मानसीक, भावनिक छळाबाबत व त्यांचे पालनपोषण न करता त्यांच्यावर उपासमारीची वेळ येवू नये याकरीता संबंधीत व्यक्तीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ प्रमाणे प्रकरण प्रलंबित असताना अंतरिम पोटगीची व्यवस्था करण्यात आली आहे. ही व्यवस्था ज्या महिलेला अथवा जेष्ठ नागरिक यांना कुटुंबातील कमविती व्यक्ती दुर्लक्षीत करत असतील व त्यांची जबाबदारी स्वीकारण्यास कोणीही तयार नसेल तर त्या व्यक्तीची कमाईच्या अभावी उपासमार होऊ नये व तिला आवश्यक असणारी आर्थीक मदत मिळावी जेणे करुन सदर व्यक्ती कमीत कमी कायदेशीर लढाई लढू शकेल या हेतूने केलेली आहे.

०६. दोन्ही बाजूंना मान्य असलेल्या बाबी ह्या की अर्जदार हे सामनेवाला क्र. १ यांचे वडील व सामनेवाला क्र. २ हिचे सासरे आहेत.

**<u>वादप्रश्न क्र. १ व २ बाबत</u> : –**

०७. सामनेवाला क्र. १ व २ यांनी हजर होऊन सदर अर्जावर कोणतेही म्हणणे दिलेले

नाही. तसेच अर्जदार यांनी नामदार सर्वोच्च न्यायालयाच्या **रजनेश विरुध्द नेहा एआयआर २०२१ एससी ५६९** या न्यायनिर्णयाप्रमाणे बहुतांश माहिती दिलेली दिसून येत नाही. मात्र अर्जदार यांचा वयाचा विचार करता, त्यांच्या उपजिविकेसाठी त्यांना कोणती ना कोणती अंतरिम तरतूद करणे हे न्यायोचित ठरणारे आहे. सबब, अर्जदार यांनी पुढील दोन महिन्यांत त्याचा उत्पन्नाचा दाखला व इतर सर्व बाबी रजनेश विरुध्द नेहा या न्यायानिर्णयाप्रमाणे पुर्तता करण्याच्या अटीवर मंजूर करणे योग्य ठरेल.

**वादप्रश्न क्र. ३ बाबत : –**

०८. वादप्रश्न क्र. १ व २ यांच्या निष्कर्षान्वये प्रस्तुत अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. अर्जदार यांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार यांना दरमहा रक्कम रु. ३,०००/– (रक्कम रुपये तीन हजार मात्र) अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून द्यावेत.

३. अर्जदार यांनी पुढील तारखेला स्वतःचा पुरावा दाखल करावा. अर्ज निकाली होण्यास अर्जदार यांच्यामुळे विलंब होत असल्याचे दिसून आल्यास अंतरिम पोटगीचा आदेश रद्द करण्यात येईल.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

५. आदेशाची प्रत अर्जदार यांना मोफत देण्यात यावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR
Digitally signed by DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR
Date: 2025.04.29 12:21:56 +0530

दि. २३/०४/२०२५ (डी.वाय.रायरीकर)

वेंगुर्ला न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग वेंगुर्ला